**सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या नातेवाईकाची नियुक्ती करण्याबाबतचे निकष ठरविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक.एसजीए-१५०८/प्र.क्र.१४६६(अ)/कामगार-५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १५.७.२००९

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात खाजगी सुरक्षा रक्षक नोकरीचे नियमन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ लागू करण्यांत आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम १५(१) अनुसार शासनाला सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली असून या सल्लागार समितीच्या दि.२५.२.२००९ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर नियुक्ती करताना त्यांच्या नातेवाईकांसाठी निकष ठरविण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

दि.२५.२.२००९ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर नियुक्ती करताना त्यांच्या नातेवाईकांसाठी खालीलप्रमाणे पात्रतेच्या अटी व निकष ठरवीत आहे. :-

१) सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक मृत पावल्यास त्याच्या जागी प्रथम मृत सुरक्षा रक्षकाचे पत्नीस पात्र असल्यास नोंदणी देण्यांत येईल.

२) मृत सुरक्षा रक्षकाची पत्नी इच्छूक किंवा पात्र नसल्यास त्याच्या पाल्यास (मोठा मुलगा किंवा मोठी मुलगी) क्रमवारीनुसार व पात्रतेनुसार मंडळात नोंदणी देण्यांत येईल.

३) सुरक्षा रक्षकाच्या मृत्यू समयी त्याचा पाल्य १८ वर्षाखाली असल्यास व तो १८ वर्षाचा झाल्यानंतर त्यास मंडळात नोंदणी घेण्याची इच्छा असल्यास त्याने / तिने १८ वर्षे पूर्ण झाल्यापासून एक वर्षाच्या आत मंडळाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. तद्नंतर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही. त्या दरम्यान मोठा मुलगा जो पात्र आहे तो मृत पावला तर त्याच्या नंतरचा मुलगा / मुलगी पात्र असल्यास नोंदणीस पात्र ठरेल. त्याकरितां पात्रतेच्या अटी उपरोक्त प्रमाणेच राहतील.

४) मृत सुरक्षा रक्षकाची पत्नी, मुलगा किंवा मुलगी इच्छूक किंवा पात्र नसल्यास मृत सुरक्षा रक्षकाचा पाल्य : भाऊ / बहिण / भावाचा मुलगा / मुलगी / बहिणीचा मुलगा / मुलगी यापैकी इच्छूक असलेल्या व पात्र असलेल्या नातेवाईकास उपरोक्त क्रमवारीनुसारच मंडळात नोंदीत करण्यांत येईल.

५) मृत सुरक्षा रक्षकाच्या वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही एकाच नातेवाईकास मंडळात नोंदणी देण्यांत येईल.

........२

६) मंडळात नोंदीत करावयाच्या मृत सुरक्षा रक्षकाच्या नातेवाईकास सुरक्षा रक्षक पदाच्या पात्रतेच्या सर्व अटी (दि.१९.०६.२००६ च्या शासन आदेशानुसार) लागू आहे.

७) वरील अटींच्या अधीन राहून प्राधान्य क्रमाने मृत सुरक्षा रक्षकाच्या एक पाल्य किंवा एक नातेवाईक एका वेळी अनुकंपा तत्वावर मंडळाकडे नोंदणीसाठी अर्ज करु शकेल.

८) मृत सुरक्षा रक्षकाची पत्नी अथवा क्रमवारीनुसार पाल्य मंडळात नोंदीत होण्यास इच्छूक नसल्यास व अनु.क्र. ४ मध्ये वर्गीकृत केलेल्या नातेवाईकास मंडळात नोंदीत करावयाचे असल्यास मृत सुरक्षा रक्षकाच्या पत्नीने व क्रमवारीनुसार पाल्याने तसे प्रतिज्ञापत्र (रुपये १००/-) मंडळास सादर करणे आवश्यक आहे.

९) अनुकंपा तत्वावर नियुक्ती करताना महिला अर्जदारांसाठी उंचीची मर्यादा शिथील करण्यात येऊन १५० सें.मी. इतकी निश्चित करण्यांत आली आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये शासनास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कविता गुप्ता)
सचिव (कामगार)

प्रति,

कामगार आयुक्त, मुंबई
सह आयुक्त कामगार, मुंबई
अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळ
निवड नस्ती (कामगार-५)

AKWGRpg 14